# श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.सोमेश्वरनगर

ता.बारामती, जि.पुणे

## परिपत्रक

जावक क्र. ऊस विकास/परिपत्रक/ ५८६ /२०२२-२०२३ दिनांक - १६ / ०५ /२०२२

लागण हंगाम सन २०२२-२०२३ साठी व गाळप हंगाम सन २०२३-२०२४ करिता मा.संचालक मंडळाने मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव व वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट मांजरी बु।। पुणे यांचे सल्ल्यानुसार खालीलप्रमाणे ऊस लागण नियोजन केलेले असून त्याप्रमाणे पुढील हंगामात सभासद/शेअर मागणीदार यांनी ऊस लागण करावी.

**संचालक मंडळ सभा दि. १३/०५/२०२२ ठराव क्र. १५ नुसार**

| अ.नं. | लागवड हंगाम | हंगामाचा कालावधी | ऊस जाती | ऊस तोडणी कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | आडसाली | **१५ जुन ते ३० जुलै** | को ८६०३२ | कारखाना चालु झालेपासुन तोडणी चालु |
| | | | व्हीएसआय ९८०५ | कारखाना चालु झालेपासुन तोडणी चालु |
| | | **१५ जुन ते १५ जुलै** | कोएम ०२६५ | **आडसाली को-८६०३२ व व्हीएसआय ९८०५ ची तोडणी संपलेनंतर** |
| २ | पुर्व हंगामी | १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | कोसी ६७१ | १ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | को ८६०३२ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | व्हीएसआय ९८०५ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | कोएम ०२६५ | आडसाली ऊसाची तोडणी संपलेनंतर |
| | | १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | एमएस १०००१ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर | व्हीएसआय ०८००५ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| ३ | सुरू | १५ डिसें. ते २८ फेब्रुवारी | एमएस १०००१ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | -''- | कोसी ६७१ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | -''- | को ८६०३२ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | -''- | व्हीएसआय ०८००५ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | -''- | व्हीएसआय ९८०५ | १५ फेब्रुवारी पासुन तोडणी चालु |
| | | १५ डिसें. ते ३१ जानेवारी | कोएम ०२६५ | आडसाली व पुर्वहंगामी ऊस संपलेनंतर |
| ४ | खोडवा | २८ फेब्रुवारी अखेर तुटलेल्या ऊसाचा खोडवा | कोसी ६७१ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | को ८६०३२ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | व्हीएसआय ९८०५ | १५ डिसेंबर पासुन तोडणी चालु |
| | | -''- | एमएस१०००१ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | -''- | कोएम ०२६५ | १ जानेवारी पासुन तोडणी चालु |
| | | | व्हीएसआय ०८००५ | १५ जानेवारी पासुन तोडणी चालु |

**खोडवा व पुर्वहंगामी हंगामातील लवकर पक्व होणाऱ्या (एमएस१०००१,व्हीएसआय०८००५) ऊसाच्या तोडणीचा कार्यक्रम आडसाली ऊस शिल्लक राहिला तरी नियमाप्रमाणे केला जाईल.सदरचे परिपत्रक १०,००० एकर आडसाली ऊस गृहीत धरून केले आहे.**

- ***सर्वसाधारण सुचना -***

१) कारखान्याचे पोटनियम क्र.१७ (अ) २,३, I, II, III नुसार सभासदाने मालक, संरक्षित कुळ अथवा साधे कुळ, सहिस्सेदार या नात्याने त्याने धारण केलेल्या व प्रत्यक्ष त्याच्या ताब्यामध्ये असलेल्या क्षेत्रामधूनच ऊस नोंद देणे बंधनकारक आहे व तशी नोंद त्याने धारण केलेल्या शेतजमिनीचे शासकीय महसुली रेकॉर्डला असणे बंधनकारक आहे व अशाच ऊस नोंदीचे क्षेत्र गाळपास स्विकारले जाईल.

२) सभासदाचे धारण किंवा मालकी हक्काचे शेतजमिन वा ऊस नोंदीबाबत वाद उपस्थित झालेस त्याची जबाबदारी संबंधीत सभासदाची राहील व असा ऊस स्विकारणेचे बंधन कारखान्यावर राहणार नाही मात्र कायदेशीर बाबीवर झालेल्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

३) कारखान्याचे गाळप हंगाम सुरु झाले नंतर ऊस नोंदणीबाबत व गाळपाबाबत तसेच ऊस बिलांबाबत उपस्थित होणाऱ्या तक्रारी संबंधाने कारखाना पोटनियम व परिपत्रकिय धोरणानुसारच कार्यवाही केली जाईल.मे.न्यायालयामध्ये प्रलंबीत प्रकरणांवर मे.न्यायालयाच्या निर्णयानुसार अंतीम कार्यवाही केली जाईल.मे.न्यायालयीन प्रक्रियेमध्ये विलंबामुळे होणारे संबंधितांचे नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही.

४) सभासदांचे अंतर्गत कौटूंबिक शेतजमिनीच्या प्रश्नांमुळे निर्माण होणारे वाद व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबधीत सभासदाची राहील.सभासदाने आपले वाद,प्रश्न आपल्या स्तरावर अगर मे.न्यायालयामध्ये अगर योग्य त्या न्यायाधिकरणाकडे परस्पर दाद मागुन निर्णित करुन घ्यावेत व तसे कारखान्यास लेखी स्वरुपामध्ये कळविल्यानंतरच सदर निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.असे वाद,प्रश्न संपुष्टात न आलेस त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबंधीत सभासदाची राहील.

५) सभासदांनी ऊस लागवड आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ऊस बेणे लागणीपुर्वी १०० लि.पाणी + ३६ ग्रॅम इमिडाक्लोप्रिड (७० टक्केwg)+ १०० ग्रॅम बावीस्टीनची १० मिनिटांपर्यंत बेणे प्रक्रिया करावी व त्यानंतर बेणे ॲसिटोबॅक्टर १ लि.व पीएसबी (स्फुरद विरघळविणारे जिवाणू)१ लि.आणि वसंत उर्जा १ लि. २००लि.पाण्यात मिसळुन तयार केलेल्या द्रावणात ऊसाची टिपरी ३० मिनीटे बुडवून लागण करावी.जैविक खते व व्हि.एस.आय.निर्मित वसंत उर्जा कारखान्यावरती नाममात्र दरात उपलब्ध आहेत.तसेच माती परिक्षण करुन शिफारशीत प्रमाणात बेसलडोसचा वापर करावा.

मागे पहा

**६) दि.१५/०६/२०२२ पासुन आडसाली ऊस लागण करणे करिता परवानगी देण्यात आली आहे. दि.१५/६/२०२२ ची क्रमवारी ड्रॉ पद्धतीने दि.२०/६/२०२२ रोजी काढण्यात येईल. ऊस लागण नोंदीचे फॉर्म सभासदांनी दि.१३/६/२०२२ पासून दि.१५/६/२०२२ पर्यंत गट ऑफिसमध्ये वेळेत भरून देणेचे आहेत. त्याची लागण तारीख दि.१५/०६ धरली जाईल.पुढील नोंदीचे फॉर्म ज्या त्या दिवशी भरून देणेचे आहे. तसेच दि.१/१० मधील लागण नोंदी जास्त आलेस सदर नोंदीचा ड्रॉ दि.६/१०/२०२२ रोजी काढण्यात येईल.**

७) कारखान्याने ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी ऊसाची नियमबाह्य लागण केल्यास सदर ऊसाची लागण तारीख ठरवून दिलेल्या तारखेपासून पुढे १५ दिवस उशिरा धरली जाईल.

८) रोप लागण ज्या दिवशी शेतात केली जाईल त्या दिवशीचीच लागण तारीख नोंद घेतली जाईल. लागण तारखेनुसार ऊस तोडीसाठी आडसाली हंगामातील प्रथम लवकर पक्व होणाऱ्या ऊस जातीची (को.८६०३२,व्हि.एस.आय.९८०५ या जातींची)रोपे व टिपरी लागणीस प्राधान्याने तोड देण्यात येईल व नंतर आडसाली हंगामातील को.एम.०२६५ या जातीच्या ऊस रोपे लागणीच्या ऊसास व त्यानंतर आडसाली हंगामातील को.एम.०२६५ या जातीच्या टिपरी लागणीच्या ऊसास तोड देण्यात येईल.तसेच इतर हंगामातील प्रत्येक महिन्यातील लवकर पक्व होणाऱ्या ऊस जातीची रोपे व टिपरी लागणीस व नंतर त्या त्या महिन्यातील कोएम ०२६५ या जातीच्या ऊस रोपे लागणीच्या ऊसास व शेवटी त्या त्या महिन्यातील को.एम.०२६५ या जातीच्या टिपरी लागणीच्या ऊसास तोड देण्यात येईल.

**९) सभासदांनी आडसाली ऊस सरसकट कापुन काढलेचे निदर्शनास आलेस त्या ऊसाची लागण तारीख रद्द होईल व सभासदांना त्या ऊसाची लागण तारीख पुन्हा नव्याने देणे बंधनकारक राहिल. सदर ऊसाची नव्याने दिलेली नोंद खोडवा म्हणुन घेणेत येईल.अशा खोडव्यास व्यवस्थापनाने दिलेले कोणत्याही प्रकारचे अनुदान लागु होणार नाही.**

**१०) सभासदांनी नजरचुकीने किंवा जाणिवपुर्वक दि.१६/७ ते ३०/७ दरम्यान को.एम. ०२६५ या ऊस जातीची टिपरी लागण करुन को.८६०३२ किंवा व्हि.एस.आय.९८०५ या जातीची नोंद दिलेली निदर्शनास आलेस त्यांच्या आधीच्या लागण तारखा रद्द होऊन त्यांच्या तारखा पुर्व हंगामी धरुन त्यांना त्याप्रमाणे तोड देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

११) ऊसाची लागण ४.५ फुट किंवा ५ फुट पट्टा पद्धतीने केल्यामुळे प्रती एकरी ऊस उत्पादनात वाढ होत असून पट्टा पद्धतीने लागवड केल्यामुळे ऊसावरील कीड व रोग नियंत्रित करणे सोपे जाते. तसेच यांत्रिक पद्धतीने तोडणी करीता पट्टा पद्धतीने लागण करणे गरजेचे आहे. **अन्यथा तोडणी मजूरांच्या उपलब्धते अभावी स्वत: ऊस तोडून कारखान्यावर आणावा लागेल याची नोंद घ्यावी.**

१२) प्रती एकरी १० मे.टन किंवा त्यापेक्षा कमी ऊस असणाऱ्या क्षेत्राची ऊस तोडणी मजूर करीत नसल्यामुळे सदरचा ऊस त्या ऊस उत्पादकास स्वत: तोडून कारखान्यावर पोहोच करावा लागेल.

**१३) परिपत्रकानुसार सभासदाने लागण क्षेत्राची नोंद ज्या त्या वेळी देणेची आहे.तसेच लागण नोंद करेक्ट करते वेळी ऊस बेणे टिपरी मातीआड असणे आवश्यक आहे.अन्यथा सदरील क्षेत्राची लागण नोंद रद्द केली जाईल.खोडवा ऊसाची नोंद २८ फेब्रुवारी पर्यंत घेणेत येईल.त्याचप्रमाणे ऊस लागण नोंदणीबाबत काही तक्रार असल्यास ऊस लागण नोंद दिले नंतर १५ दिवसाचे आत अर्ज देणे,त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.तसेच नंतर कोणत्याही प्रकारची नोंद रुजवात घेताना घेतली जाणार नाही.**

**१४) ऊस उत्पादकांनी दिलेली लागण नोंद खोटी (बोगस) असल्यास रू. ५००/- ऊस बिलातून वसूली केली जाईल व त्याची नोंद रद्द केली जाईल. सदर रद्द केलेल्या क्षेत्राची नोंद सभासदाने पुन्हा देणे आवश्यक आहे.**

१५) हुमणी किडीसाठी ट्रॅप क्रॉप (सापळा पिक) म्हणुन ताग,भुईमुग,एरंड चे बी ऊसात मध्ये मध्ये पेरावे.तसेच हुमणी किडीच्या पुर्व नियंत्रणासाठी जैविक किडनाशकाची ( बी.व्हि.एम.) मात्रा प्रतीएकरी २ लिटर प्रती २०० लिटर पाण्यात मिसळुन वाफश्याचे वेळी आळवणीव्दारे द्यावे.

१६) सभासदांना बायोकंपोस्ट खताची विक्री रोखीने तसेच चालु गळीत हंगामात गळीतास आलेल्या संभाव्य ऊस बिलावर उधारीवर केले जाईल.

१७) सभासदांना कारखान्याच्या सोयी सवलती उदा.ऊस बियाणे,ऊस रोपे,मातीचे व पाण्याचे परिक्षण,ताग व ध्यैच्या,सबसॉईलर,बायोकंपोस्ट खत इ. सुविधा शेअर्सच्या प्रमाणात दिल्या जातील.सदर सोयी सवलतीच्या मागणी अर्जा सोबत सभासदाने आपले फोटो ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

१८) मध्यम ते हलक्या जमीनीत ऊस लागवड करणाऱ्या सभासदांनी पुर्व हंगामी व सुरु हंगामात को ८६०३२,एम.एस१०००१, व्ही.एस.आय.९८०५,कोसी६७१ या ऊस जातीची लागवड करावी.सदर ऊसाची तोडणी प्राधान्याने केली जाईल.

१९) ७/१२ प्रमाणे नोंदी देणे बंधनकारक आहे . सदरची नोंद मयत,वारस प्रकरण,घरगुती वाटप,खरेदी विक्री किंवा ७/१२ बदल झालेस ऊस नोंद क्षेत्र वर्ग करणेत येईल अन्यथा नोंदीप्रमाणे ऊस गळीतास आणला जाईल.

२०) ऊस विकास परिपत्रक जा.क्र.३७३६ दि.०७/११/२०१८ नुसार ऊस वाढ प्रोत्साहन योजनेत ज्या सभासदांस भाग घ्यावयाचा आहे त्यांनी नोंदणी रक्कम रु.१००/-तोडणी पुर्वी भरुन आपला सहभाग नोंदवावा.सदर योजनेमध्ये यापुर्वी बक्षिस मिळालेले सभासद पुन्हा बक्षिसास पात्र राहणार नाहीत.

२१) ज्या सभासदांचे मोबाईल क्र.बदललेले असतील त्यांनी आपले मोबाईल क्र.कारखान्याच्या मुख्य कार्यालयात येऊन बदलुन घ्यावेत.

२२) सदरचे लागण नियोजन परिपत्रकामध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

तरी वरील सुचनांचे पालन करून सर्व सभासदांनी सहकार्य करावे ही विनंती.

**● आपले नम ●**

**(राजेंद्र ना.यादव)**
कार्यकारी संचालक

**(आनंदकुमार शां.होळकर)**
व्हा.चेअरमन

**(पुरुषोत्तम रा.जगताप)**
चेअरमन

**व**

**संचालक मंडळ**